
ePaper

## भाजप-एकनाथ शिंदे यांच्या खऱ्या शिवसेनेचा भगवा फडकेल; फडणवीस



| वर्ष - 6 । अंक - 175 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- 'भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या खऱ्या शिवसेनेचा भगवा फडकेल
- महापालिका कर्मचाऱ्यांना 'दिवाळी गिफ्ट'
- शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी सेंद्रिय शेतीला चालना

www.mahaenews.com | शुक्रवार । दिनांक 7 ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# निवृत्त अधिकारी डॉ. रॉय कुटुंबियांवर हल्ला!

## दांडिया मंडपावरून वाद : पिंपरी पोलिसांकडून गुन्हे दाखल





**।पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

दांडियासाठी लावलेले मंडप काढताना झालेल्या वादातून पिंपरी-चिंचवड महापालिकेचे निवृत्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल रॉय यांच्यासह कुटूंबियांवर हल्ला झाला आहे. या घटनेत डॉ. रॉय यांच्यासह 3 ते 4 जण गंभीर जखमी झाल्याचे समजते. हा प्रकार आज गुरुवारी रात्री काळभोरनगर येथे घडला आहे. मांडववाल्याचे पार्किंगवरून सुरू झाले भांडण

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, काळभोरनगर येथील मांडव काढण्याचे काम सुरू होते. मांडववाल्याचे पार्किंगवरून रॉय यांच्या कुटुंबातील महिला सदस्यासोबत भांडण झाले. त्यावरून बाचाबाची झाली. त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. मंडपवाल्याने मुले बोलावून घेवून डॉ.रॉय यांच्यावर हल्ला केला. त्यात ३ ते ४ जण जखमी झाले आहेत. सर्वजण पिंपरी पोलीस ठाण्यात दाखल झाले होते. रात्री उशीरापर्यंत पोलिसांची कार्यवाही सुरू होती.

# ऋतुजा पाटील हिचा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत 'सुवर्ण चौकार'

## पिंपरी-चिंचवडचा अभिमान : मालदीव येथील स्पर्धेत केले भारताचे नेतृत्व

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

मालदीव येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत भारताकडून टिम स्पोर्ट्स एल.यु.पि. इंडिया तर्फे सहभागी झालेल्या ऋतुजा पाटील हिने विविध स्केटिंग प्रकाराच्या स्पर्धेत चार सुवर्णपदके जिंकून देशाची मान उंचावली आहे. 24 व 25 सप्टेंबर रोजी मालदिव येथील माले सिटी व हूलहू माले सिटी येथे रोलर स्केटिंग असोसिएशन



ऑफ मालदीव स्केटिंग फेडरेशन तर्फे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अनेक देशातील 123 खेळाडूंनी सहभाग घेतला होता. मालदीव ऑलम्पिक कमिटीचे अध्यक्ष मोहम्मद अब्दुल सत्तार, माजी ऑलिम्पिक कमिटी अध्यक्ष इब्राहिम इस्माईल, स्पोर्ट्स मिनिस्ट्री गव्हर्मेंट ऑफ मालदीव उपमंत्री व अध्यक्ष महंमद अजमीत तसेच टिम स्पोर्ट्स एल. यु. पि. इंडिया चे अध्यक्ष वैभव बिळगी सर यांच्या हस्ते ऋतुजाला सुवर्णपदके व प्रशस्ती पत्रक देऊन गौरवण्यात आले. यावेळी टिम स्पोर्ट्स एल. यु. पि. इंडिया चे व्यवस्थापक राहुल बिळगी, टीम कॉर्डिनेटर रिषभ कावेडिया आदी उपस्थित होते. ऋतुजा हिने वाकड तसेच पिंपळे सौदागर येथील ड्रीम्स स्केटिंग क्लबमध्ये वैभव सरांकडे स्केटिंग चा सराव करते. गोवा येथे 7 व 8 जून 2022 ला संपन्न झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत ऋतुजाने प्रथम क्रमांक मिळवला व तीस हजार ची इंटरनॅशनल स्पॉन्सरशिप ही तिला मिळाली होती. दरवर्षी गोवा स्केटिंग फेस्टिवल मध्ये विजेत्या मुलांना स्पोर्ट्स एल यु इंडिया तर्फे इंटरनॅशनल स्पॉन्सरशिप दिली जाते. ती स्पॉन्सरशिप ऋतुजाला ही मिळाली होती. तसेच तिची निवड निश्चित होताच वैभव बिलगी यांनी तिच्याकडून दररोज 40 ते 50 किलोमीटरचा स्केटिंग सराव करून घेत होते. तसेच ऋतुजाने इतके कठीण ट्रेनिंग ला सामोरे जात सरांनी दिलेल्या वेळेत सराव पूर्ण करण्याचा प्रयत्न सातत्याने करीत होती.

# भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या खऱ्या शिवसेनेचा भगवा फडकेल!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वक्तव्य, उद्धव ठाकरे यांच्या दसऱ्या मेळाव्यावर टीका

**।पुणे । महाईन्यूज।**

**खरी शिवसेना ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची असल्याचे कालच्या दसऱ्या मेळाव्यामध्ये दिसले आहे. राज्यामध्ये आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये भगवाच फडकणार असून, तो भगवा हा भाजप आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्या खऱ्या शिवसेनेचा असेल, असे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. 'शिमग्यावर बोलायचे नसते,' असे सांगत**



**त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या दसऱ्या मेळाव्यावर टीका केली. कृषी विभागाच्या वतीने बालेवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या नैसर्गिक शेती राज्यस्तरीय परिषदेनंतर ते पत्रकारांशी बोलत होते.**

फडणवीस म्हणाले,'दसरा मेळाव्यामध्ये शिंदे यांच्या खऱ्या शिवसेनेसाठी गर्दी झाली होती. मुख्यमंत्री शिंदे हे सरकारच्या विकासाच्या मुद्द्यावर बोलले. राज्याच्या कानाकोपऱ्यातून लोक शिंदे यांच्या दसरा मेळाव्याला आले होते. त्यामुळे खरी शिवसेना ही शिंदे यांचीच आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीत भगवाच फडकणार असून, तो भगवा भाजप आणि शिंदे यांच्या खऱ्या शिवसेनेचा असेल.' उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना फडणवीस म्हणाले, की मी दोन्हीही भाषणे ऐकली नाहीत. मी धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमासाठी नागपूरमध्ये होतो. बातम्यांमधून जे दिसले ते पाहता, उद्धव ठाकरे गटाचा शिवाजी पार्कवर झालेला दसरा मेळावा हा मेळावा नसून, शिमगा होता. त्या शिमग्यावर बोलण्याची गरज नाही. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाही

### 'उद्धव ठाकरेंनी स्क्रिप्ट रायटर बदलावा'

पत्रकारांशी बोलताना फडणवीस यांनी शिंदे गटाचा बचाव करताना उद्धव ठाकरे गटाच्या मेळाव्याला फारसे महत्त्व न देण्याचा प्रयत्न केला. भाजपचे 'स्क्रिप्ट' मुख्यमंत्री शिंदे यांनी वाचून दाखविले, अशी टीका होत आहे. त्याबाबत एका प्रश्नाला उत्तर देताना फडणवीस म्हणाले, की आमच्या स्क्रिप्टचा विचार करण्यापेक्षा उद्धव ठाकरेंनी आपला स्क्रिप्ट रायटर बदलावा.

कधी मुख्यमंत्र्यांसारखे भाषण करू शकले नाहीत. ते कायम पक्षप्रमुख या नात्यानेच भाषण करतात. ठाकरे हे मूळ विचारधारा सोडून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर गेले. मुंबईतील बॉम्बस्फोटाशी संबंध असलेल्यांबरोबर बसणे त्यांनी मान्य केले. त्यामुळेच त्यांच्यावर ही वेळ आली आहे, असेही फडणवीस म्हणाले.

# पदपथ, रस्त्यांवर फटाका विक्रीचे स्टॉल्स लावला, तर परवाना रद्द करण्याची शिफारस

## हमीपत्रानंतरच फटाका विक्री स्टॉल्सना परवानगी

**।पुणे। महाईन्यूज ।**

महापालिकेच्या मोकळ्या जागांवर; तसेच खासगी मिळकतंमधील मोकळ्या जागा किंवा बंदिस्त जागांवर फटाका विक्री स्टॉल्सला परवानगी देताना पदपथांवर स्टॉल्स लावले जाणार नाहीत, असे हमीपत्र घेतल्यानंतरच फटाका व्यावसायिकांना परवानगी देण्यात येणार आहे. पदपथ, रस्त्यांवर फटाका विक्रीचे स्टॉल्स उभारल्यास परवाना रद्द करण्याची शिफारसही महापालिकेच्या अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकान निर्मूलन विभागाने केली आहे. महापालिकेच्या अतिक्रमण आणि बांधकाम निर्मूलन विभागाकडून याबाबतचे परिपत्रक काढण्यात आले आहे. मालमत्ता आणि व्यवस्थापन उप आयुक्त, परवाना आणि आकाशचिन्ह विभागाचे उप आयुक्त, सर्व क्षेत्रीय कार्यालयील महापालिका सहाय्यक आयुक्त आणि अग्निशमन दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी यांना हमीपत्र घेण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.



**पदपथ, रस्त्यांवर फटाका विक्रीचे स्टॉल्स उभारल्यास परवाना रद्द करण्याची शिफारसही महापालिकेच्या अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकान निर्मूलन विभागाने केली आहे. महापालिकेच्या अतिक्रमण आणि बांधकाम निर्मूलन विभागाकडून याबाबतचे परिपत्रक काढण्यात आले आहे. मालमत्ता आणि व्यवस्थापन उप आयुक्त, परवाना आणि आकाशचिन्ह विभागाचे उप आयुक्त, सर्व क्षेत्रीय कार्यालयील महापालिका सहाय्यक आयुक्त आणि अग्निशमन दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी यांना हमीपत्र घेण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.**

दिवाळीवेळी तात्पुरत्या स्वरूपात फटाका आणि शोभेची दारू विक्री करण्यासाठी परवाने मंजूर केले जातात. सर्वोच्च न्यायालयात यासंदर्भात जनहित याचिका दाखल आहे. त्यानुसार राज्याच्या नगरविकास विभागाने योग्य ती कार्यवाही करण्याची सूचना स्थानिक स्वराज्य संस्थांना केली आहे. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त कार्यालयाने महापालिकेच्या स्तरावर मान्य धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासंदर्भात संबंधित विभागांना आदेश दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाकडून त्याबाबतचे परिपत्रक काढण्यात आले आहे. दिवाळीमध्ये तात्पुरते फटाका विक्री स्टॉल्सना परवानगी देताना शहरातील पदपथांवर फटाका विक्रीला परवानगी दिली जाणार नाही. महापालिकेच्या मोकळ्या जागा, खासगी मिळकतींमधील मोकळ्या किंवा बंदिस्त जागावर नियमानुसार परवानगी घेताना रस्ता, पदपथांवर अनधिकृतपणे फटाका विक्रीचे स्टॉल्स लावले जाणार नाहीत, याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे. पदपथ, रस्त्यांवर फटाका आणि शोभेची दारू विक्रीचे स्टॉल्स उभारले जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. अनधिकृत फटाका विक्री स्टॉल्स उभारणाऱ्यांवर स्थानिक पोलिस ठाण्याच्या मदतीने कायदेशीर कारवाई करावी किंवा त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत. अनधिकृत फटाका विक्रीचे स्टॉल्स पदपथ किंवा रस्त्यांवर टाकणाऱ्यांना पुढील वर्षी परवाने दिले जाऊ नयेत, असे या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# 'मॉडर्न'ची 'गाभारा' एकांकिका 'भरत' करंडकाची मानकरी



**।पुणे। महाईन्यूज ।**

अरे आवाज कुणाचा'च्या घोषणाबाजीमध्ये मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालयाची 'गाभारा' एकांकिका 'भरत' करंडकाची मानकरी ठरली. भरत नाट्य संशोधन मंदिरातर्फे आयोजित स्पर्धेत कलादर्शन, पुणे संस्थेच्या 'यशोदा' एकांकिकेस द्वितीय तर रेवण एंटरटेन्मेंटच्या 'असा ही एक कलावंत' या एकांकिकेस तृतीय पारितोषिक देण्यात आले.

भरत नाट्य संशोधन मंदिरातर्फे भरत करंडक एकांकिका स्पर्धेतील विजेत्या संघांना ज्येष्ठ अभिनेते स्वरूप कुमार यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. 'लोकसत्ता'चे सहायक संपादक मुकुंद संगोराम कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. भरत नाट्य संशोधन मंदिराचे अध्यक्ष पांडुरंग मुखडे, विश्वस्त रवींद्र खरे, प्रदीप रत्नपारखी, प्रतिभा दाते, कार्याध्यक्ष अभय जबडे, कार्यवाह आणि स्पर्धेचे परीक्षक संजय डोळे, अश्विनी अंबिके, चंद्रशेखर भागवत या वेळी उपस्थित होते.ताण कमी होईल, अशी माहिती पीएमआरडीएचे मुख्य अभियंता विवेक खरवडकर यांनी दिली. संस्थेच्या नाटकांतून पुढे आलेला बालकलाकार अर्णव पुजारी, नृत्यांगना भाग्यश्री कुलकर्णी, गायिका-अभिनेत्री अनुष्का आपटे, चारूलता पाटणकर, ऑर्गनवादक राहुल गोळे, लेखक-दिग्दर्शक व अभिनेते संजय डोळे यांचा सत्कार करण्यात आला. कचरावेचकांच्या मुलांसाठी कार्यरत असलेल्या सासवडजवळील सार्थक संस्थेला अर्थसाह्य करण्यात आले. तसेच, वरदा इनामदार, सृष्टी नागवंशी, सान्वी घोलप या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. भारताला शास्त्रशुद्ध शिक्षण पद्धतीची प्रदीर्घ परंपरा लाभली आहे. तैतरीय उपनिषदात स्पष्टपणे दीक्षान्त समारंभाचे भाषण आणि विद्यार्थ्यांनी घ्यायच्या शपथेचा उल्लेख आहे. पदवीधारकांना आयुष्यात हवे ते मिळो किंवा न मिळो, पण आयुष्यात जे मिळते ते त्यांनी प्रेमाने केले पाहिजे. कोणतेही चांगले-वाईट काम करताना विद्यार्थ्यांनी संस्थेचा गौरव लक्षात ठेवावा, असे डॉ. देब्रॉय यांनी सांगितले.

# महापालिका कर्मचाऱ्यांना 'दिवाळी गिफ्ट'!

## आयुक्त शेखर सिंह यांचा निर्णय : 8.33 टक्के सानुग्रह, 20 हजार रुपये रक्कम

पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका कर्मचा-यांना ८.३३ टक्के सानुग्रह अनुदान आणि जादा २० हजार रुपये रक्कम देण्यात येणार आहे. आयुक्त शेखर सिंह यांनी हा निर्णय घेतला. त्यामुळे साडेआठ हजार कर्मचा-यांची दिवाळी गोड होणार आहे. याबाबतचा आदेश प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त बाळासाहेब खांडेकर यांनी काढला आहे.**





पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघ आणि पिंपरी चिंचवड महापालिका यांच्यात गेल्यावर्षी पंचवार्षिक वेतन करार झाला आहे. २०२०-२१ ते २०२४-२५ पर्यंत हा करार आहे. गेल्यावर्षी झालेल्या करार करताना पाच हजार रुपयांनी सानुग्रह अनुदानात वाढ केली होती. त्यानुसार वर्ग १ ते ४ मधील अधिकारी, कर्मचाऱ्यांना ८.३३ टक्के सानुग्रह अनुदान आणि जादा २० हजार रुपये रक्कम देण्यास आयुक्तांनी मान्यता दिली आहे. या बोनसचा महापालिकेतील साडेआठ हजार कर्मचा-यांना लाभ होणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

तसेच, शाखाधिकारी व शाखाप्रमुख यांनी 2022-23 च्या अंदाजपत्रकामध्ये सानुग्रह अनुदान व जादा रक्कम अदाईगी करण्याच्या लेखा शीर्षकाखाली केलेली तरतूद अपुरी पडल्यास तरतूद वर्गीकरणाची कारवाई करावी. तसेच 8.33 टक्के सानुग्रह अनुदान आणि जादा 20 हजार रुपये रक्कम सर्व कर्मचाऱ्यांना दिवाळी पूर्वी मिळेल याची दक्षता घ्यावी. त्याबाबतची बिले तयार करून तातडीने लेखा विभागाकडे सादर करावीत. लेखा विभागाने तातडीने बिले तपासून रक्कम अदाईगी संदर्भातील कार्यवाही करावी. बिलांच्या विलंबाबाबत शाखा प्रमुखांना जबाबदार धरण्याचा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

### महर्षि वाल्मिकी जयंतीनिमित्त आरोग्य शिबिर...

महर्षि वाल्मिकी जयंती निमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे. दि. ८ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२२ या कालावधी दरम्यान महर्षि वाल्मिकी यांच्या जयंती निमित्त विविध समाज उपयोगी उपक्रम तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पिंपरी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक या ठिकाणी दि.८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता आरोग्य शिबिराचे उद्घाटन होणार आहे.

# गुजराती समाजाने राष्ट्रीय एकात्मता जपली

## आमदार उमा खापरे : रावेत येथे नवरात्रोत्सव उत्साहात



पुणे।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्राधिकरण येथील श्री द्वारकाधिश सेवा मंडळ व गरवी गुजराती समाजाच्या वतीने रावेत येथे नऊ दिवसाचा नवरात्र महोत्सव पारंपारिक पद्धतीने साजरा झाला. पिंपरी चिंचवड शहरातील गुजराती बांधव गेली अनेकवर्षे या शहरात नोकरी व्यवसायानिमित्त स्थायिक झाले असून नवरात्र निमित्त समाज बांधव एकत्र येवून रासगरबा दांडीयाचा खेळ खेळून आनंद लुटतात.**

यंदाच्या वर्षी नवरात्रौ उत्सवानिमित्त पिंपरी चिंचवड शहरातील विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सेवाभावी संस्था, व्यक्ती आदींचा सत्कार आमदार उमा खापरे, श्री द्वारकाधिश सेवा मंडळाच्या अध्यक्षा किरण पटेल, गरवी गुजराती समाजाचे अध्यक्ष मुकेश चुडासमा, धनश्याम गजेरा, भरत दवे, ऋतिक पटेल, हार्दिक जानी, राम राज्यगुरु, जेन्ती राठोड, जिग्नेश पटेल, गीरधर विराणी यांच्या हस्ते अमित गोरखे (शैक्षणिक), सुर्यकांत मुथीयान (पर्यावरण) अशोक तनपुरे (पोलिस मित्र संघटना) जतीन परमार (मानवी हक्क सेवा) डॉ. गणेश अंबिके (आरोग्य व आपत्ती व्यवस्थापन) गुलामअली भालदार (चिंचवड प्रवासी संघ) सुरज आसदकर (वृत्तपत्रातील डिझाईनर) सुहास जोशी (अन्नदान आरोग्य) विल्यम साळवी (व्यसनमुक्ती) यांना स्मृतीचिन्ह व शाल देवून गौरविण्यात आले.

आमदार उमा खापरे याप्रसंगी पुढे म्हणाल्या, माझे बालपण मुंबईत गेले आज येथे पारंपारिक गुजराती गायक, वादकांच्या सुर-तालाने मी मंत्रमुग्ध झाली असून येथे अनेक वर्षांनी गरबा खेळ खेळून माझ्या बालपणाची आठवणी ताज्या झाल्या. देशभरात गुजराती समाज हा सण मोठ्या आनंदाने साजरा करतो. नवरात्रौ महोत्सवात येथील संस्थांनी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करून खऱ्याअर्थाने नवरात्रौ सणानिमित्त जणू राष्ट्रीय एकात्मता निर्माण केली. सत्कारमुर्ती सर्व मान्यवरांनी शहराच्या विकासात आपापल्या क्षमतेनुसार कार्यरत आहे. अशांना एकत्रित करून त्यांना गौरविण्यात आले. ही देखील कौतुकास्पद बाब आहे.

यावेळी श्री द्वारकाधिश सेवा मंडळाच्या अध्यक्षा किरण पटेल यांच्याहस्ते आमदार उमा खापरे यांचा खास स्मृतिचिन्ह गौरव व सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना गरवी गुजराती समाजाचे

# चांदणी चौक पूल : श्रेयवादासाठी चढाओढ

## पोलिसांसह महामार्ग अधिकाऱ्यांच्या माथी कष्टच; पूल पाडल्यानंतर श्रेयवाद



।पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज।

मुंबई-बंगळूर महामार्गावरील पुणे येथील चांदणी चौकातील जुना पूल पाडण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून नियोजन करण्यात येत होते. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वाहतूक कोंडीत अडकल्यानंतर या हालचालींनी वेग घेतला. यात प्रामुख्याने पोलीस आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी पुढाकार घेतला. पूल २ आक्टोबरला पाडण्यात आला. मात्र, त्याचे श्रेय घेण्यावरून विविध यंत्रणांमध्ये चढाओढ सुरू झाल्याचे दिसून येते. चांदणी चौक येथे वाहतूक कोंडीत अडकलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी वाहनचालक आणि प्रवाशांनी संवाद साधत गाऱ्हाणे मांडले. कोंडी नेहमीचीच असल्याचे सांगितले. त्यामुळे उपाययोजना करण्याबाबत मुख्यमंत्री शिंदे यांनी सूचना केली. त्यानुसार पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, अपर आयुक्त संजय शिंदे, उपायुक्त आनंद भोईटे तसेच पुणे येथील पोलीस अधिकारी व महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी यांच्यासह इतर विभागातील अधिकाऱ्यांनी चांदणी चौकात पाहणी केली. उपाययोजना करण्याबाबत आढावा घेतला. पूल पाडण्याचा निर्णय घेऊन त्याबाबत तत्काळ नियोजन केले.

पूल पाडण्यासाठी कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर करायचा यावर खल झाले. त्यानंतर खासगी कंपनीला जबाबदारी देण्यात आली. मात्र, पुलाचे काम करण्यासाठी वाहतूक वळविण्यात आली. त्यासाठी पोलिसांचा कस लागला. पोलिसांनीही नियोजन केले. पुणे शहर, ग्रामीण तसेच पिंपरी-चिंचवड पोलिसांनी समन्वयाने वाहतूक पर्यायी मार्गांवरून वळवून वाहनचालकांना दिलासा दिला.

## संपादकीय

# मोफतच्या मोहात

***महाराष्ट्रातील काही शहरांजवळ समुद्र नाही म्हणून; नाहीतर तेथे उभ्या राहणाऱ्या दिग्गज नेत्यांनी 'येथे बंदर बांधून देऊ' असे आश्वासन द्यायलाही कमी केले नसते, अशी गमतीदार टीका महाराष्ट्रात केली जायची. तिचा रोखही बेफाट आश्वासने देण्यावरच होता. मात्र, तेव्हाची आश्वासने आणि आजची आश्वासने यांच्यात एक मूलभूत फरक आहे.***

निवडणुकीचा प्रचार करताना तुम्ही जी भरघोस आश्वासने देता, ती कशी पुरी करणार आहात आणि त्यासाठी निधीची तरतूद कशी केली जाणार आहे, अशी विचारणा अखेर केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना केली आहे. आयोगाने तसे पत्र पक्षांना पाठविले आहे. मात्र, निवडणूक आयोगाने आपली आधीची भूमिका बदललेली दिसते. गेली काही वर्षे वाढत्या क्रमाने प्रचारात जी मोफतगिरी चालू आहे, तिच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्यासाठी घटनापीठही नेमले आहे. न्यायालयाने या आधीही निवडणूक आयोगाला 'प्रचारात दिल्या जाणाऱ्या टोलेजंग आश्वासनांच्या बाबतीत तुमचे काय म्हणणे आहे?' अशी विचारणा केली होती. मात्र, तेव्हा निवडणूक आयोगाने या प्रश्नापासून स्वत:ला वेगळे करीत राजकीय पक्षांवरच या आश्वासनांच्या नैतिकतेची जबाबदारी टाकली होती. आता आयोगाची भूमिका वेगळी आहे. या नव्या भूमिकेचे स्वागत करायला हवे.

गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर चमकू लागलेल्या 'आम आदमी पक्षा'च्या वर्तनावर इतर साऱ्याच पक्षांचा आक्षेप दिसतो. प्रचार करताना आम आदमी पक्षाचा मुख्य रोख मोफत वीज, मोफत पाणी, मोफत शिक्षण आणि मोफत आरोग्यसेवा यांची आश्वासने देण्यावर असतो. मतदारांना निवडणुकीच्या प्रचारात आश्वासने देण्याची प्रथा नवी नाही. महाराष्ट्रातील काही शहरांजवळ समुद्र नाही म्हणून; नाहीतर तेथे उभ्या राहणाऱ्या दिग्गज नेत्यांनी 'येथे बंदर बांधून देऊ' असे आश्वासन द्यायलाही कमी केले नसते, अशी गमतीदार टीका महाराष्ट्रात केली जायची. तिचा रोखही बेफाट आश्वासने देण्यावरच होता. मात्र, तेव्हाची आश्वासने आणि आजची आश्वासने यांच्यात एक मूलभूत फरक आहे. तेव्हाची बहुतेक आश्वासने ही 'सार्वजनिक' स्वरुपाची असत. म्हणजे, कारखाना आणू, कॉलेजे उघडू, धरणे बांधू किंवा रस्ते करू... वगैरे. या सार्वजनिक आश्वासनांची जागा आता 'तुमच्या कुटुंबाचे वीज बिल माफ होईल. तुमच्या मुलांना मोफत कम्प्युटर मिळेल. तुमच्या घरातल्या महिलांना कायमचा मोफत बसप्रवास करता येईल,' अशा स्वरुपाची असतात. व्यापक विकासाऐवजी कल्याणकारी राज्याचा अतिरेक करणारी ही आश्वासने आहेत का, हा यातला मूलभूत प्रश्न आहे. त्यामुळे, या आश्वासनांच्या घटनात्मकतेचा विचार सर्वोच्च न्यायालयाला करावा लागेल. निवडणूक आयोगाने आपली अलिप्तता झटकून पक्षांना पत्रे पाठविली, हेही चांगलेच झाले.



## आनंदी सकाळ

# ज्ञानी विवेकजनित आणि विज्ञानयुक्त महात्मा

माळरानावर सूर्य किरणांमुळे पाण्याचा भास होतो व ते खरे आहे, असे समजून हरीण त्या पाण्याच्या मागे धावते. पण त्याला पाणी तर मिळत नाही, उलट अतिश्रमाने त्याचा मृत्यू होतो. अशीच अवस्था माणसाची होते. मृगजळासम असलेल्या या संसाराला तो सत्य मानतो. एकीकडे त्याला मुक्तीची इच्छा आहे. 'मी'ची अंधुक, अज्ञानवश का होईना, पण जाणीव आहे आणि दुसऱ्या बाजूला 'मी' काय आहे हे नेमके कळत नाही. आपल्याभोवती वावरणाऱ्या लोकांमध्ये काही अज्ञानी, काही मुमुक्षू व काही ज्ञानी जीव आहेत. अज्ञानी जीव देहालाच सत्य समजतात. 'देहोऽहं' देह असे ते समजतात. याच लोकांची संख्या जास्त असते. त्यांना मोक्षाची इच्छाच उत्पन्न होत नाही. हे अज्ञानीबद्ध जीव असतात. इतर जिवांना मी मुक्त झालो पाहिजे ही



## भूमिका

# दसरा दिवस देखला थोर मोठा, आनंदाला नाही मुळीच तोटा



दसरा दिवस देखला थोर मोठा, आनंदाला नाही मुळीच तोटा. लुटले सोने, विचार लुटले, धन्य झालो, धन्य झालो. कित्येक फिरलो मेळावे, आम्ही धन्य झालो. मुंबापुरीत पार्कावरी, तसेच आणिक बीकेसीवरी, त्या तिकडे भगवानाच्या गडावरी, नि तिकडे नागपुरातल्या मुख्यालयी. फिरलो फिरलो धन्य झालो. पाहिले झेंडे कित्येक, पाहिले रंग कित्येक. काय काय ऐकले, काय काय देखिले, काय सांगू, कसे सांगू, धन्य झालो. बोलणारे ऐसे एकेक वक्ते, शब्द जाणती थोर नि पक्के. देती ऐसे एकेक धक्के, काय सांगू. बोलणाऱ्यांची त्या काय थोरवी, बोलणाऱ्यांची काय ती वाट, मुक्कामाचा त्यांच्या जबरी थाट. कुणी विसावती व्हॅनिटीत, कुणी अवतरती थेट घरातुनी, कुणी येत गाडीतुनी, मंचावरी अवतरताना सारेच मोहरती टाळ्यांतुनी. जरी आम्हा वाट आमची पायतळीची खड्ड्यांची, त्यांसी असे ती वायुमार्गाची आणिक अदबीची. खात खात धक्के, पोहोचलो आम्ही, करिता करिता तंगडतोड, आले जरी पायाला फोड, आमच्या नेत्यांसाठी धक्के नि फोड, आम्ही मानून घेऊ गोड. ठावे आम्हाला आमुचे नेते, महान, महनीय; व्हीआयपी, व्हीव्हीआयपी त्यांचा वर्ग, त्यांचे दिसणे, त्यांचे ऐकणे हेही आम्हासाठी स्वर्ग. आमचा वर्ग आपुला असाच हलका सलका, नाही मनी आमुच्या त्यांबाबत कुठलाच भ्रम भलता सलता. ठावे आम्हास त्यांची क्षुधा मोठी आमुच्या क्षुधेहुनी, उदर आमुचे छोटेच त्यांच्याहुनी. ठावे आम्हा आमची तृष्णा खुजी त्यांच्या तृष्णेहुनी, कंठ तोकडा आमचा त्यांच्या कंठाहुनी. म्हणूनच पदार्थ नवरंगी खाण्यास दिमतीला त्यांच्या, वडापाव झणकेदार खिशात आमच्या. बदाम, पिस्ते, काजू यांची महिरप शोभतसे त्यांच्या पानांतुनी, लाल, हिरव्या चटणीची नक्षी आमच्या वडापावातुनी. परी आम्हास तमा नाही त्याची, नेत्यांच्या शब्दांची थोरवी साची. त्यांच्यासाठी सोसू हालही आम्ही, तरी सांगू त्यांना, पुढे पुढेच जा तुम्ही. करू तंगडतोड, खाऊ आणिक खस्ता, तरीही करू जयजयकार तुमचा हसता हसता. परी सांगायचे एक आहे तुम्हाला, सांगता समाधान लाभेल आम्हाला. तसे नाहीच आम्ही मोठे, तुमच्यापुढती अगदीच छोटे. ठरला जर लहान तोंडी मोठा घास, उदार मनाने माफी करावी आम्हास.

# पुलाच्या प्रेमळ आठवणी...

**आमच्या गावातला चांदणी चौकातला पूल पडल्यापासून मनात अशी एक उदासी भरून राहिली आहे. कुठल्याही पुलाला असं अकाली जावं लागणं बरं नव्हे.**

मात्र, दुसऱ्याच्या सोयीसाठी स्वत:चं बलिदान देणारा आमचा हा पूल आता पुण्याच्या हृदयात कायमचा विराजमान झाला आहे. या पुलाबाबतच्या आमच्या आठवणी केवळ हळव्या करणाऱ्या आहेत. तेव्हा कात्रज-देहूरोड हा या पुलाच्या जीवावर उठलेला बायपास नव्हता. तो एक छोटा तिठा होता. या चौकाला काही नावही नव्हतं. नंतर तिथल्या एका बारमुळं हे नामाभिधान त्यास प्राप्त झालं. पाषाण, बाणेर, बावधन ही तेव्हा पुण्याजवळची छोटी गावं होती. हा स्पॉट तेव्हा आमच्या गावातल्या प्रेमीमंडळींना फिरायला जाण्यासाठीचा होता. अगदी अलीकडे-अलीकडेपर्यंत त्याची ही कीर्ती होती. जेव्हा कुठलाही चौक किंवा तिठा किंवा रस्ता सुनसान असतो, तेव्हाच तो प्रेमीजनांना प्रिय होतो.



एनडीए रोड, पाषाणकडं जाणारा रोड आणि पौडकडे जाणारा तिसरा रोड या तिन्ही शांत-निवांत रस्त्यांवर तेव्हा आमच्या गावातली प्रेमपाखरं कोपरे पकडून विसावलेली असत. (आपणही एकदा 'तसं' तिथं बसावं, ही आमची महत्त्वाकांक्षा होती. असो.) हळूहळू इथं बायपास रस्ता झाला आणि त्यानं इथल्या शांततेलाच 'बायपास' केलं. आताही त्या रस्त्यानं जाताना तिथल्या गोंगाटात प्रेमीजनांची ती नाजूक किणकिण एखाद्या स्वप्नासारखी आठवते. तिथले मोठमोठे पाषाण, कल्व्हर्ट, रस्त्याच्या कडेचे संरक्षक कठडे आणि चहा-भजीच्या तुरळक टपऱ्या या साऱ्यांच्या साक्षी आहेत. आजूबाजूला हिरवेगार डोंगर, झाडी, एनडीएच्या बाजूनं ऐकू येणारी मोरांची केका अशा वातावरणात आमच्या पाखरांचंही 'गुटर्गू' सुरू असायचं. हा पूल अशा कित्येक प्रेमीजनांच्या बाइक्स, स्कूटरी, चारचाक्या यांचं ओझं बाळगत खंबीरपणे उभा होता. इथंच किती नाती जुळताना त्यानं पाहिली असतील; किती ब्रेक-अप, किती अफेअर्स पाहिली असतील! पुलाच्या शरीरात स्टील आणि लोखंड असलं, तरी अंत:करणात मात्र त्यानं इथल्या हजारो प्रेमीजनांच्या हळव्या-मुक्या भावनांचंच ओझं वाहिलं होतं. प्रेमाचे बंध फार चिवट असतात असं म्हणतात. म्हणूनच परवाच्या स्फोटात पहिल्याच धडाक्यात तो कोसळला नाही. जखमी झाला; पण ताठ उभा राहिला. शेवटी 'जालीम जमाना'रूपी जेसीबी आणि पोकलेनांनी त्याला धक्के मारून मारून अखेर पाडलंच. ती दैवी दुर्घटना पाहताना तिथं एकदा तरी बसलेला प्रत्येक प्रेमी हळहळला असेल, कळवळला असेल.

## ।। अभंगवाणी ।।



वळितें जें गाई ।
त्यासि फार लागे काई ॥१॥
निवे भावाच्या उत्तरीं ।
भलते एके धणी वरी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### 'नाराजीची चर्चा थांबवा, निवडणुकीच्या तयारीला लागा'

। बीड । महाईन्यूज ।
'माझ्या नाराजीची चर्चा पुरे झाली. पुढील वेळी पक्षाने उमेदवारी दिली तर ठीक आहे. तुम्ही मात्र आता २०२४ च्या निवडणुकीच्या तयारीला लागा', असा संदेश भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी बुधवारी भगवानगडावरील दसरा मेळाव्यात समर्थकांसमोर केलेल्या भाषणात दिला. काही दिवसांपूर्वी पक्षनेतृत्वाविरुद्ध आक्रमक भूमिका घेणाऱ्या पंकजा यांनी आपली भूमिका मवाळ केल्याचे यावेळी दिसून आले. 'माझे काय चुकले? मंत्री म्हणून चांगले काम केले. राज्यभर फिरून पक्षासाठी काम केले नाही का?', असा थेट प्रश्न पंकजा यांनी विचारला. आता पदाची अपेक्षा करू नका. पक्षाला त्रास द्यायचा नाही, कुठल्याही नेत्याबद्दल बोलायचे नाही, अशा शब्दात पंकजा मुंडे यांनी आपल्या मनातील खदखद व्यक्त केली. मात्र, समर्थकांनी आपापल्या भागात जाऊन २०२४ च्या निवडणुकीसाठी तयारीला लागावे. समर्पणाची ताकद एकदा दाखवून देवू असा संदेशही त्यांनी दिला.

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी सेंद्रिय शेतीला चालना!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती



। मुंबई । महाईन्यूज ।
शेतकरी आत्महत्या रोखणे आणि सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. सेंद्रिय शेतीला लोकचळवळीचे स्वरूप देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी राष्ट्रीय नैसर्गिक शेती आणि डिजिटल शेती यावरील कार्यशाळेत दिली. नवी दिल्लीत आज राष्ट्रीय नैसर्गिक शेती आणि डिजिटल शेतीवर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत एकनाथ शिंदे हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. यावेळी बोलताना शिंदे यांनी कृषी व्यवसायास प्रोत्साहन देणे आणि कृषी उत्पादनांची मूल्य साखळी विकसित करण्यासाठी बाळासाहेब ठाकरे स्मार्ट प्रकल्प आणि एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या मदतीने मॅग्नेट प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून नैसर्गिक शेतीवरही भर देण्यात येत असल्याची माहिती दिली. राज्यात सुमारे ५.२७ लाख हेक्टर क्षेत्रात प्रमाणित सेंद्रिय शेती केली जाते. राज्यातील आदिवासी भागासह १० लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली येत असून केंद्राच्या कृषी विकास योजना आणि भारतीय नैसर्गिक शेती प्रणाली योजनेच्या माध्यमातून सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन दिले जात आहे. रासायनिक औषधे आणि खतांचा वापर कमी व्हावा यासाठी विज्ञानाधारित सेंद्रिय शेतीसाठी राज्यात प्रयत्न सुरू आहेत. रासायनिक खते आणि औषधांशिवाय जमिनीचे संवर्धन करण्यासाठी राज्य शासन नैसर्गिक शेती पद्धतीचा वापर वाढविण्याबाबत शेतकऱ्यांना आवाहन करीत आहे. यामुळे कमी खर्च आणि अधिक फायदेशीर शेती होण्यास मदत होईल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

### सेंद्रिय शेती आणि डिजीटल शेतीसाठी मास्टर्स ट्रेनर कार्यक्रम सुरू करणार

राज्यात आतापर्यंत १ हजार ६२८ शेतकरी गटातील ६१ हजार शेतकऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना माफक दरात नैसर्गिक आणि सेंद्रिय शेती प्रमाणित करण्यासाठी राज्य शासनाची स्वतंत्र प्रमाणन संस्था स्थापन करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्रात डॉ.पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती अभियानाची स्थापना करण्यात आली असून त्या माध्यमातून राज्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त भागात सेंद्रिय शेतीवर भर देण्यात येत आहे, असेही शिंदे यांनी सांगितले. नैसर्गिक आणि डिजिटल शेती संदर्भात प्रशिक्षणाची गरज असून यासाठी मास्टर्स ट्रेनर कार्यक्रम राज्यात सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही देतानाच त्यासाठी केंद्र सरकारने सहकार्य करण्याचे आवाहन एकनाथ शिंदे यांनी यावेळी केले.

### ई – पीक पाहणीत एक कोटी हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावरील पिकांची माहिती

डिजिटल शेतीसाठी प्रयत्न करण्यात येत असून राज्यातील २ कोटी २० लाख ४५ हजार ९०१ शेतकऱ्यांचे भूमी अभिलेख माहितीचे डिजिटलायझेशन पूर्ण झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. शेतकरी ई – हक्क प्रणालीवर फेरफार नोंदीसाठी ऑनलाइन अर्जाची सुविधा असून अर्जाची सद्यस्थिती जाणून घेण्याची सोय असल्याचे त्यांनी सांगितले. ई-पीक पाहणी उपक्रमातून एक कोटी हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावरील पिकांची माहिती मिळाली आहे. प्रधानमंत्री शेतकरी विमा योजनेच्या ऑनलाइन पोर्टलवर १ कोटी १२ लाख शेतकऱ्यांचा डाटाबेस उपलब्ध आहे. जमिनीच्या नोंदीनुसार या डेटाबेसची दुरुस्ती करण्याची प्रक्रिया राज्यात सुरू असून हा डाटाबेस इतर योजनांच्या अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वासही शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

# धनुष्यबाण तातडीने आम्हाला द्या अन्यथा तातडीने गोठवा!

## शिंदे गटाची निवडणूक आयोगाकडे धाव

। मुंबई । । महाईन्यूज ।
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या घटनेला निवडणूक आयोगापुढे आव्हान दिले असून खरी शिवसेना कोणाची, यावर तातडीने निर्णय देण्याची मागणी केली आहे. अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धनुष्यबाण हे शिवसेनेचे निवडणूक चिन्ह आम्हाला तातडीने मिळावे किंवा याबाबत तातडीने काही आदेश द्यावा अशा शब्दांत प्रसंगी धनुष्यबाण चिन्ह गोठवण्याची अप्रत्यक्ष मागणी शिंदे गटाने निवडणूक आयोगाला सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात केली आहे. अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघासाठी पोटनिवडणूक जाहीर झाली असून खरी शिवसेना आम्ही असल्याने पक्षाचे धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह




तातडीने आम्हाला मिळावे. अन्यथा उद्धव ठाकरे यांच्या गटाकडून त्या चिन्हाचा वापर होण्याची शक्यता आहे. काही कारणास्तव धनुष्यबान चिन्ह आम्हाला तातडीने देणे शक्य नसल्यास या चिन्ह बाबत तातडीने काही आदेश द्यावा अशी विनंती करत अप्रत्यक्षरित्या धनुष्यबाणचिन्ह प्रसंगी गोठवण्याची मागणी शिंदे गटाने निवडणूक आयोगाकडे केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाने राष्ट्रीय कार्यकारिणी व प्रतिनिधी सभेवरील सदस्यांच्या नियुक्त्या करण्याच्या दुरुस्तीस आव्हान दिले असून त्या पक्षांतर्गत निवडणूक पध्दतीने घेण्याच्या प्रस्तावासह काही बदल सुचविले आहेत. शिंदे यांनी पक्षप्रमुख हे पद घेणार नसून ' मुख्य नेते ' असे पक्षाचे सर्वोच्च पद प्रस्तावित केले आहे. शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे गटानेही कायदेशीर लढाईची तयारी केली असून शुक्रवारी अनेक शपथपत्रे व कागदपत्रे सादर केली जाणार असल्याचे खासदार अनिल देसाई यांनी सांगितले.

# "पाट्याटाकू" दुकानदारांची सोमवारपासून झाडाझडती;

## 7 दिवसांच्या मुदतीनंतर पालिकेकडून कारवाई

। मुंबई । महाईन्यूज ।
मुंबई महापालिकेने दिलेली मुदत संपूनही दुकाने, हॉटेल्सवर मराठी भाषेत व ठळक मोठ्या अक्षरात नामफलक न लिहिणाऱ्या दुकानदारांची येत्या सोमवारपासून पालिकेकडून झाडाझडती घेण्यात येणार आहे. "पाट्याटाकू" दुकानदार, हॉटेल्सला आणखीन ७ दिवसांची मुदत देण्यात येणार असून, त्यानंतर पालिका कारवाईचा बडगा उगारणार आहे.मुंबईतील दुकानदार, हॉटेलचालक विविध आस्थापना यांनी मराठी भाषेत आणि ठळक मोठ्या अक्षरात नामफलक लिहिणे कायद्याने बंधनकारक आहे. मुंबईतील ५ लाख हॉटेल्स, दुकानदारांपैकी दोन लाख ते अडीच लाख दुकाने, हॉटेल्स याठिकाणी नियमाने मराठी भाषेत व ठळक मोठ्या अक्षरात नामफलक लावण्यात आले




आहेत. मात्र पाकिकेने ३ वेळा मुदतवाढ देऊनही आणि शेवटची मुदत ३० सप्टेंबर रोजी संपूनही उर्वरित दुकाने, हॉटेल्स यांनी अद्यापही नियमानुसार नामफलक लावलेले नाहीत.

दुकानदारांना पुन्हा एकदा मुदतवाढ हवी आहे. पालिकेने कारवाई करू नये व कारवाईला स्थिगिती मिळावी यासाठी दुकानदारांच्या संघटनेने सर्वोच्च न्यायालयात अंतिम लढा देण्याची तयारी सुरू केली आहे. मात्र येत्या सोमवारपासून दुकानांची तपासणी करून ज्यांनी नियमानुसार मराठीत पाट्या लावल्या नाहीत त्यांना ७ दिवसांची मुदत देण्यात येणार आहे. मात्र त्यानंतरही मराठी भाषेत नामफलक न केल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई केली जाणार असल्याचे सांगण्यात येते. दरम्यान, पालिका प्रशासनच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या या दुकानदारांवर मेहेरबान नजरेने पाहत आहे, अशी कुरबुर नागरिकांमध्ये सुरू आहे. पालिकेच्या अधिकाऱ्यांची कारवाईची मानसिकता आहे का, अशी शँकाही उपस्थित करण्यात येत आहे.

# उत्तर कोरियाने डागलेल्या क्षेपणास्त्राचा भारताकडून निषेध!

## जपानची सुरक्षितता धोक्यात आल्याचे केलं नमूद

**। राजस्थान । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



उत्तर कोरियाने जपानवरून डागलेल्या क्षेपणास्त्राचा भारताने निषेध नोंदवला आहे. यामुळे जपानसह लगतच्या परिसरातील शांती आणि सुरक्षितता धोक्यात आल्याचे भारताने म्हटले आहे. उत्तर कोरियाने क्षेपणास्त्र डागल्यानंतर अमेरिका, इंग्लंड आणि फ्रान्सनेही निषेध नोंदवला आहे. पाच वर्षांत उत्तर कोरियाने जपानवर डागलेले हे पहिले क्षेपणास्त्र आहे. हे क्षेपणास्त्र मंगळवारी जपानच्या क्षेत्रात असलेल्या प्रशांत महासागरात सकाळी ७ वाजून ४४ मिनिटांनी पडले होते. या वर्षांत उत्तर कोरियाने २४ वेळा क्षेपणास्त्राची चाचणी केली आहे. “उत्तर कोरियाने डागलेल्या क्षेपणास्त्राची आम्ही दखल घेतली आहे” असे संयुक्त राष्ट्रामधील भारताच्या स्थायी प्रतिनिधी रुचिरा कंबोज यांनी सुरक्षा परिषदेत म्हटले आहे. या घटनेवर संयुक्त राष्ट्रामधील अमेरिकेच्या राजदूत लिंडा थॉमस-ग्रीनफिल्ड यांनी ब्राझिल, भारत, आर्यलँड, जपान, नॉर्वे, दक्षिण कोरिया, इंग्लंड, सौदी अरेबियासह ११ देशांच्यावतीने संयुक्त निवेदन जारी केले आहे. या प्रक्षेपणाने सुरक्षा परिषदेच्या ठरावाचे उल्लंघन केले आहे. यामुळे केवळ जपानमधील प्रदेशालाच नाही तर आंतरराष्ट्रीय समाजाला धोका निर्माण झाल्याचे निवेदनात म्हटले आहे.

संयुक्त राष्ट्रामधील उत्तर कोरियाशी संबंधित ठरावांची पूर्णपणे अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी रुचिरा कंबोज यांनी केली आहे. कोरियन द्वीपकल्पात शांती आणि सुरक्षितता प्रस्थापित करणे सामूहिक हिताचे आहे. या द्वीपकल्पातील समस्या सोडवण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरीचे आम्ही समर्थन करतो, असे कंबोज यांनी म्हटले आहे. कोरियन द्वीपकल्प अण्वस्त्रमुक्त व्हावा, यासाठीही पाठिंबा असल्याचे भारताने स्पष्ट केले आहे.

हे क्षेपणास्त्र मंगळवारी जपानच्या क्षेत्रात असलेल्या प्रशांत महासागरात सकाळी ७ वाजून ४४ मिनिटांनी पडले होते. या वर्षांत उत्तर कोरियाने २४ वेळा क्षेपणास्त्राची चाचणी केली आहे. “उत्तर कोरियाने डागलेल्या क्षेपणास्त्राची आम्ही दखल घेतली आहे” असे संयुक्त राष्ट्रामधील भारताच्या स्थायी प्रतिनिधी रुचिरा कंबोज यांनी सुरक्षा परिषदेत म्हटले आहे. या घटनेवर संयुक्त राष्ट्रामधील अमेरिकेच्या राजदूत लिंडा थॉमस-ग्रीनफिल्ड यांनी ब्राझिल, भारत, आर्यलँड, जपान, नॉर्वे, दक्षिण कोरिया, इंग्लंड, सौदी अरेबियासह ११ देशांच्यावतीने संयुक्त निवेदन जारी केले आहे. या प्रक्षेपणाने सुरक्षा परिषदेच्या ठरावाचे उल्लंघन केले आहे. यामुळे केवळ जपानमधील प्रदेशालाच नाही तर आंतरराष्ट्रीय समाजाला धोका निर्माण झाल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# पश्चिम बंगालमध्ये दुर्गा विसर्जनावेळी नदीला अचानक आलेल्या पुरामुळे 7 जणांचा मृत्यू



**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

पश्चिम बंगालमध्ये दुर्गा विसर्जनावेळी नदीत अचानक आलेल्या पुरामुळे 7 जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. बुधवारी रात्री पश्चिम बंगालमधील जलपायगुडी येथील माल नदीत ही दुर्घटना घडली. या घटनेत अनेकजण बेपत्ता असल्याची माहिती मिळते. याशिवाय अनेक जण अजूनही नदीत अडकले आहेत. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी एनडीआरएफची टीम दाखल झाली. तसेच, त्यांनी रात्री उशिरापर्यंत बचावकार्य केल्याचे समजते.

पश्चिम बंगालच्या जलपाईगुडी येथे दुर्गा मूर्ती विसर्जनावेळी माल नदीच्या पाण्याची पातळी अचानक वाढ झाली. त्यामुळे जोरदार प्रवाहात अनेक लोक वाहून गेली. लोकल वाहून जात असल्याचे दिसताच, घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. अपघातानंतर तातडीने जिल्हा प्रशासनाने विसर्जनाचा कार्यक्रम थांबवून लोकांच्या बचावकार्यास सुरुवात केली. या अपघातात 7 जणांचे मृतदेह सापडले असून 10 जखमींना वाचवण्यात यश आले आहे. दरम्यान, नदीच्या पाण्यात वाहून जात असलेले लोकं जीव वाचवण्यासाठी आरडाओरडा करत होते. मात्र नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाल्याने नदीत उतरण्याचे धाडस कोणीच करत नव्हते. त्यामुळे अनेक महिला व पुरुष पुराच्या पाण्यात वाहून गेले. या दुर्घटनेत काही जणांना प्रशासनाने वाचवले, मात्र अनेकांचा अद्यापही काही पत्ता नाही.

# केरळमध्ये दोन बसच्या भीषण अपघातात 9 जणांचा मृत्यू, 40 जखमी

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



केरळमध्ये दोन बसमध्ये झालेल्या भीषण अपघातात 9 जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला पर्यटक बसचे नियंत्रण सुटले आणि कार ओव्हरटेक करताना केएसआरटीसी बसच्या मागील बाजूस आदळली. ताबा सुटल्यानंतर पर्यटक बस नजीकच्या दलदलीत जाऊन धडकली. वालार-वडक्कनचेरी राष्ट्रीय महामार्गावरील अंजुमूर्ती मंगलम बस स्टॉपजवळ हा अपघात झाला.

या अपघातात 12 जण गंभीर जखमी झाले असून 28 जण किरकोळ जखमी झाले आहेत. टुरिस्ट बसमध्ये ४१ विद्यार्थी, पाच शिक्षक आणि दोन कर्मचारी होते. KSRTC बसमध्ये 49 प्रवासी होते.

मृतांमध्ये केएसआरटीसी बसमधील तीन प्रवासी आणि टुरिस्ट बसमधील पाच प्रवाशांचा समावेश आहे. यात सहा पुरुष आणि तीन महिलांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये KSRTC प्रवासी रोहित राज (24) थ्रिसूर आणि ओ अनूप (22) हे कोल्लमचे आणि शाळेतील कर्मचारी नॅन्सी जॉर्ज आणि व्हीके विष्णू यांचा समावेश आहे. या अपघातात मृतांची संख्या वाढण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. जखमींना पलक्कड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृतांचे मृतदेह अल्थूर आणि पलक्कड रुग्णालयात आहेत. हरिकृष्णन

# मेक्सिकोमध्ये अज्ञातांकडून अंदाधुंद गोळीबार!

## महापौरांसह 18 जणांचा मृत्यू

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

अमेरिकेचा शेजारी देश मेक्सिकोमध्ये अज्ञाकांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात 18 जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. या घटनेत मेक्सिको सिटीच्या महापौरांचाही मृत्यू झाला आहे. या गोळीबारात तीन जण गंभीर जखमी झाल्याचेही समजते. या गोळीबाराची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी दाखल हल्लेखोरांना गोळीबार करूनच प्रत्युत्तर दिलं. मिळालेल्या माहितीनुसार, दक्षिण-पश्चिम मेक्सिकोच्या सॅन मिगुएल टोटोलापन येथील सिटी हॉल आणि



जवळच्या घरावर हल्लेखोरांनी गोळीबार केला. या गोळीबारात 18 जणांचा मृत्यू झाला असून 3 जण जखमी झाले. या घटनेचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे. यामध्ये अज्ञात हल्लेखोर गोळीबार करताना दिसत आहेत. शिवाय, सिटी हॉलच्या भिंतींवर शेकडो गोळ्या दिसत आहेत. हॉलच्या खिडक्यांच्या काचाही तुटल्या आहेत.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये किमान 10 लोकांचे मृतदेह एकमेकांच्या जवळ पडलेले दिसले. मृतांच्या संख्येबद्दल परस्परविरोधी अहवाल आले होते, परंतु राज्य ॲटर्नी जनरलच्या कार्यालयाने पुष्टी केली असून, 18 जण मृत आढळली आहेत. मृतांमध्ये महापौर कोनराडो मेंडोझा, त्यांचे वडील आणि माजी महापौर जुआन मेंडोझा आणि इतर शहर पोलिस अधिकारी यांचा समावेश आहे.

या हल्ल्यानंतर पोलिसांनी प्रत्युत्तर दिले मात्र हल्लेखोरांनी तेथून पळ काढला. त्यामुळे हल्लेखोरांच्या शोधासाठी प्रत्येक ठिकाणी नाकाबंदी लावल्याचे समजते. परंतू अद्याप एकही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही.

# ज्ञानेश्वर माउली' मालिकेत अवधूत गांधी साकारणार संत नामदेव



मराठी वाहिनीवरील 'ज्ञानेश्वर माउली' या मालिकेने प्रेक्षकांना संतांची परंपरा उलगडवत भक्तिरसात तल्लीन केले आहे. माउली आणि त्यांची भावंडं यांचे चमत्कार, रेड्यामुखी वेद, सार्थ श्रीज्ञानेश्वरी, विश्वरूप दर्शन, पसायदान हे सारं काही प्रेक्षकांना विशेष भावलं. प्रेक्षक हरिभक्तीच्या या अलौकिक प्रवासाचे साक्षीदार झाले आहेत. मालिकेतल्या प्रत्येक व्यक्तिरेखेवर प्रेक्षकांनी भरभरून प्रेम केलं आहे. पण आता मालिकेत विविध संतांची मांदियाळी अनुभवायला मिळत असताना यात आणखी एका संताचा प्रवेश होणार आहे. संतांच्या या प्रवासाची सुरुवात संत कान्होपात्रा यांच्या येण्याने झाली. संत चोखामेळा यांची कथाही प्रेक्षकांना पाहायला मिळाली आणि प्रेक्षकांना ती भावली आहे. आता मालिकेत संत नामदेव यांचा प्रवेश होणार आहे. माउली आणि नामदेव यांची भेट कशा प्रकारे होणार, हे पाहणं रंजक ठरणार आहे. संत नामदेव यांची भूमिका अवधूत गांधी साकारणार आहेत. अवधूत गांधी हे वारकरी संप्रदायातलं नावाजलेलं व्यक्तिमत्त्व.




# 'ऐ जिंदगी' चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

आजकाल चित्रपटांमध्ये काल्पनिक गोष्टींपेक्षा सत्यकथांवर आधारित चित्रपट जास्त चालतात. प्रेक्षकांना गूढपट, सत्यघटनेवर आधारित चित्रपट बघण्यात जास्त रस आहे. नुकताच एका अविश्वसनीय सत्यकथेवर आधारित असलेला 'ऐ जिंदगी' चित्रपटाचा ट्रेलर, पोस्टर सोशल मीडियावर सध्या कमालीच ट्रेंडिंग होत आहेत. हा चित्रपट प्रेक्षकांना अखेरपर्यंत खिळवून ठेवणारा आहे. यात विविध भाषेतील कलाकार काम करत आहेत. दाक्षिणात्य अभिनेत्री रेवती, मराठमोळी अभिनेत्री मृण्मयी गोडबोले, सत्यजित दुबे हे कलाकार मुख्य भूमिकेत आहेत.या चित्रपटाची कथा एका २६ वर्षीय यकृत सिरोसिस रुग्ण विनय चावलाचा प्रवास दाखवणारी आहे. त्याची जीवनावरील आशा विश्वास पुन्हा जागृत करण्याचे काम रेवती यांनी साकारलेले पात्र करते. या चित्रपटाचे दिग्दर्शन डॉ.अनिर्बन बोस यांनी केलं आहे ज्यांनी 'बॉम्बे रेन्स', 'बॉम्बे गर्ल्स', 'माईस इन मेन' आणि 'द डेथ ऑफ मिताली दत्तो' या कादंबऱ्या लिहल्या आहेत. माध्यमांशी संवाद साधताना ते असं म्हणाले, 'ऐ जिंदगी' आणि मी सामान्यपणे करत असलेल्या गोष्टींमध्ये खूप मोठा फरक आहे. मी एक डॉक्टर असल्यानं रूग्णांची काळजी घेतो, तसंच मेडिकलच्या विद्यार्थ्यांना शिकवतो. मला माझ्या कम्फर्ट झोनबाहेर काढून, आयुष्यातील दोन वर्षे या चित्रपट निर्मितीकरिता समर्पित करण्यास प्रवृत्त करणाऱ्या या कथेतील सौंदर्य प्रेक्षकांना प्रेमात पाडल्याशिवाय राहणार नाही'. या चित्रपटातील मराठमोळी अभिनेत्री मृण्मयी गोडबोले म्हणाली 'ऐ जिंदगी' ही आशा, प्रेम आणि उभारीची कथा आहे. यात खूप आपलेपणाचे वातावरण असल्याने प्रेक्षक प्रत्येक कॅरेक्टरशी स्वतःला रिलेट करतील. या चित्रपटात मी एका मल्याळम नर्सची भूमिका साकारली आहे, जी माझ्यासाठी नवीन आणि आव्हानात्मक होती'.ऐ जिंदगी' हा चित्रपट येत्या १४ ऑक्टोबर रोजी संपूर्ण भारत आणि उत्तर अमेरिकेतील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे. प्लॅटून वन फिल्म्सने या संस्थेने चित्रपटाची निर्मिती केली आहे. याआधी संस्थेने 'पिकासो' आणि 'युअर्स ट्रुली' सारख्या प्रशंसनीय चित्रपटांची निर्मिती केली होती. शिलादित्य बोरा हे या संस्थेचे संस्थापक आहेत. ज्येष्ठ गुजराती अभिनेते हेमंत खेर, श्रीकांत वर्मा, सावन टँक, मुस्कान अग्रवाल आणि प्रांजल त्रिवेदी हे कलाकारदेखील चित्रपटात दिसणार आहेत.



प्राइम व्हिडीओने आपल्या चाहत्यांना आणि दर्शकांना आपल्या आगामी प्रोजेक्ट्सची माहिती सर्वात आधी देण्यासाठी सुपर-फॅन आणि #PRIMEBAE वरूण धवनची निवड केली असून वरूणने नुकत्याच त्यांच्या ओरिजिनलच्या आगामी चित्रपटाबाबत खास खुलासा केला आहे. अमेझॉन प्राइम व्हिडीओच्या आगामी ओरिजिनल चित्रपटात कन्नन अय्यर लिखित 'ए वतन मेरे वतन' हा

### 'ए वतन मेरे वतन' मध्ये मुख्य भूमिकेत दिसणार

# सारा अली खान आणि वरुण धवन

'ए वतन मेरे वतन' मध्ये सारा अली खान मुख्य भूमिकेत दिसणार आहे.वरुणने त्याच्या सिगनेचर स्टाइलमध्ये खुलासा केला की, सारा अली खान 1942 मधील भारत छोडो आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आधारित असलेल्या काल्पनिक कथेत एका शूर, स्वातंत्र्यसैनिकाची भूमिका साकारणार आहे. हा चित्रपट याच महिन्यात प्रदर्शित होणार आहे. दारब फारुकी आणि थ्रिलर ड्रामा, सत्य घटनांवर प्रेरित आहे. धर्माटिक एंटरटेनमेंट प्रॉडक्शन अंतर्गत, या चित्रपटाची निर्मिती करण जोहर आणि अपूर्व मेहता करत असून, सोमेन मिश्रा सह-निर्माता आहेत. याचे दिग्दर्शन कन्नन अय्यर करत आहेत. अमेझॉन ओरिजिनल चित्रपट रिलीज झाल्यावर प्राइम सदस्यांसाठी 240 हून अधिक देश आणि प्रदेशांमध्ये उपलब्ध असेल.

# मला महाभारतातही काम करायला आवडेल...



बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान सध्या त्याच्या 'आदिपुरुष' चित्रपटामुळे चर्चेत आहे. नुकत्याच मागील 3-4 दिवसांपूर्वी या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित करण्यात आला होता. ज्यावर सध्या सोशल मीडियावर विरोध केला जात आहे. या चित्रपटामध्ये सैफ अली खानने रावणाची भूमिका साकारली आहे. प्रदर्शित करण्यात आलेल्या टीझरमध्ये रावणाच्या भूमिकेत असणाऱ्या सैफ अली खानच्या लूकवर नेटकरी संताप व्यक्त करू लागले आहेत. दरम्यान, या विरोधानंतर सैफ अली खानने आपल्या ड्रिम रोलबाबत खुलासा केला आहे. त्याने त्याच्या एका मुलाखतीत सांगितलं की, त्याला महाभारतामध्ये देखील काम करायचं आहे.


सूत्रांच्या माहितीनुसार, एका मुलाखतीत सैफ अली खानने महाभारतामध्ये अभिनय करायला आवडेल असं सांगितलं. तसेच जेव्हा सैफ अली खानला ड्रीम रोलबाबत विचारण्यात आलं होतं तेव्हा तो म्हणाली की, मी असा विचार करत नाही.

मी फक्त तोच विचार करतो जे मला दिलं जातं. खरं सांगायचे तर माझ्याकडे माझा कोणताही ड्रिम रोल नाही. मला नाही वाटतं की असा विचार करण्याची काही गरज आहे. तरीही मी जे करू इच्छितो ते महाभारतामध्ये काम करणं आहे. जर कोणी या चित्रपटाला 'लॉर्ड ऑफ द रिंग्स' प्रमाणे बनवेल. अजय देवगणसोबत चालू आहे चर्चा

सैफ अली खानने खुलासा केला आहे की तो अभिनेता अजय देवगणसोबत यावर चर्चा करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सैफ अली पुढे म्हणाला की, "आम्ही अजय देवगणसोबत कच्चे धागेनंतर पासून यावर बोलत आहे. महाभारत आमच्या पीढीमध्ये, स्वप्नांचा विषय आहे. शक्य झाल्यास आम्ही साउथसोबत बॉम्बे फिल्म इंडस्ट्रीला जोडू. महाभारतातील करण हे पात्र मला खूप आकर्षक वाटतं."

## शॉर्ट न्यूज »

### मनिका बत्राचा सूर हरवलेलाच



।नवी दिल्ली। महाईन्यूज

चीनमधील चेंगडू येथे सुरु असलेल्या जागतिक टेबल टेनिस स्पर्धेतील भारतीय महिलांचे आव्हान संपुष्टात आले आहे. भारतीय महिला संघ उपउपांत्यपूर्व फेरीतच गारद झाला. चायनीज तैपई संघाकडून भारताला ३-० असे पराभूत व्हावे लागले. रविवारी उझबेकिस्तानला नमवल्यानंतर महिला संघाने सोमवारी इजिप्तचे आव्हान सहज परतवून लावले होते. भारताच्या या विजयात श्रीजा अकुलाची कामगिरी निर्णायक ठरली होती. चायनीज तैपईचे कडवे आव्हान मोडून काढण्यात भारतीय महिला संघाला अपयश आले. मनिका बत्रा हिला या स्पर्धेमध्ये सूर गवसला नाही. चेन झू यू हिच्याकडून मनिका हिला ११-७, ११-९, ११-३ (३-०) असे पराभूत व्हावे लागले. त्यानंतर बर्मिंघम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील टेबल टेनिस खेळातील मिश्र गटात सुवर्णपदक पटकावणारी श्रीजा अकुला हिलाही अव्वल दर्जाचा खेळ करता आला नाही.

## हिराबाई लांडगे यांच्या स्मरणार्थ

# खेळाडुंना पोशाख कीट वाटप!

### आमदार लांडगे यांचे जनसंपर्क अधिकारी संदीप ठाणेकर यांनी जोपासली सामाजिक बांधिलकी

**पिंपरी-चिंचवड। महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी**



हसुर दुमाला (जि. कोल्हापूर) या गावातील जय स्पोर्ट्स संघाच्या कबड्डीपटूना संदीप ठाणेकर यांच्या पुढाकाराने पोशाख किटचे वाटप करण्यात आले. याबद्दल गावातील खेळाडुंनी आणि ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त केले आहे.

भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या मातोश्री कै. सौ. हिराबाई लांडगे यांचे दि. २४ सप्टेंबर २०२२ रोजी निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ आमदार लांडगे यांचे जनसंपर्क अधिकारी संदीप ठाणेकर यांनी सामाजिक बांधिलकीच्या नात्याने आपल्या गावातील जय स्पोर्ट्स या संघातील खेळाडुंना पोशाख वाटप केले.

कोल्हापूर जिल्ह्याशी लांडगे कुटुंबियांचे ऋणानुबंध आहेत. आमदार लांडगे यांनी कोल्हापूर येथील तालमीमध्ये कुस्तीचे प्रशिक्षण घेतले आहे. त्यांचे वडील वस्ताद किसनराव लांडगे यांचाही कुस्तीक्षेत्रात कोल्हापूर परिसरात मित्र परिवार आहे. दोन वर्षांपूर्वी कोल्हापूरसह सांगली-सातारा परिसरात महापूराची परिस्थिती निर्माण झाली होती.

त्यावेळी लांडगे कुटुंबियांनी ‘एक हात मदतीचा’ हा उपक्रम राबवला होता. त्यामुळे कोल्हापूर आणि लांडगे कुटुंबियांची नाळ जोडलेली आहे. आमदार लांडगे यांच्या मातोश्री यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मरणार्थ खेळाडुंना पोशाख किट देताना विशेष समाधान वाटते, असे मत जनसंपर्क अधिकारी संदीप ठाणेकर यांनी व्यक्त केले.

## संजूची ८६ धावांची खेळी व्यर्थ

दक्षिण आफ्रिकेचा भारतावर 9 धावांनी विजय, मालिकेत 0-1 अशी आघाडी

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्या दरम्यानचा पहिला एकदिवसीय सामना लखनऊच्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी एकाना क्रिकेट स्टेडियमवर झाला. या मालिकेत भारताचा नियमित कर्णधार रोहित शर्मा याच्या अनुपस्थित शिखर धवनने संघाचे नेतृत्व केले. या सामन्यात शिखरने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. पावसामुळे प्रत्येकी ४० षटकांच्या



झालेल्या या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने शानदार फलंदाजी करत ४ बाद २४९ धावा धावफलकावर लावल्या. पहिल्या एकदिवसीय सामन्यात पाहुण्या संघाने यजमानांवर ९ धावांनी मात केली. विजयासाठी मिळालेल्या २५० धावांचा पाठलाग करताना श्रेयस अय्यर, शार्दुल ठाकूर व संजू सॅमसन यांनी संघर्ष केला.धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारतीय संघाची सुरुवात अतिशय खराब झाली. सलामीवीर शुबमन गिल आणि शिखर धवन त्रिफळाचीत झाले.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही